## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1962.

## THE MAHARASHTRA TAX ON GOODS (CARRIED BY ROAD) ACT, 1962.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति दिनांक १७ ऑगस्ट १९६२ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

**बी. पी. दलाल,**
महाराष्ट्र सरकारचे सचिव,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1962.

## AN ACT TO PROVIDE FOR THE LEVY AND COLLECTION OF A TAX ON GOODS CARRIED BY ROAD IN THE STATE OF MAHARASHTRA.

## सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर, "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक २० ऑगस्ट १९६२ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

**महाराष्ट्र राज्यांत रस्त्यावरून वाहून नेण्यांत येणाऱ्या मालावर कर बसविण्यासाठीं व वसूल करण्यासाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यांत रस्त्यावरून वाहून नेण्यांत येणाऱ्या मालावर कर बसविण्यासाठीं व वसूल करण्यासाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र (रस्त्यावरून वाहून नेण्यांत येणाऱ्या) मालावरील कर अधिनियम, १९६२ असें म्हणावें. **लघु संज्ञा व व्याप्ति.**

(२) तो संबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

२. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणें आवश्यक नसेल, तर, ह्या अधिनियमांत,— **व्याख्या.**

(अ) "मालाचें वाहन" ह्या संज्ञेचा अर्थ, सार्वजनिक किंवा खाजगी मालाचें वाहन, असा समजावा ;

(ब) "चालक" ह्या संज्ञेचा अर्थ, ज्याचें नांव, परवाना धारण करणारा म्हणून अशा परवान्यांत नमद करण्यांत आलें असेल असा कोणताहि इसम असा समजावा (असा परवाना हा मोटारवाहन अधिनियम, १९३९ अन्वयें, मालाचें वाहन म्हणून मोटारवाहनाचा उपयोग करण्यास अधिकृत करण्याबाबत देण्यांत आलेला किंवा जोडसही केलेला परवाना असला पाहिजे ) ;

आणि जेव्हां परवान्याशिवाय मालाचें वाहन उपयोगांत आणलें असेल किंवा त्याचा उपयोग करावयास लावला असेल किंवा उपयोग करण्यास परवानगी दिली असेल तेव्हां त्या संज्ञेत तें वाहन, मोटार वाहन अधिनियम, १९३९ अन्वयें ज्याच्या नांवें नोंदविण्यांत आलें असेल त्या इसमाचा किंवा असें वाहन ज्याच्या ताब्यांत किंवा नियंत्रणाखालीं असेल त्या इसमाचा समावेश होतो ; आणि "चालविणें" ह्या शब्दप्रयोगाचा अर्थ तदनुसार लावण्यांत आला पाहिजे ;

(क) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमान्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें ;

(ड) "खाजगी मालाचें वाहन" ह्या संज्ञेचा अर्थ, मालाच्या वाहतुकीसाठीं उपयोग करण्याकरितां तयार केलेलें किंवा सुयोग्य करून घेतलेलें (सार्वजनिक मालाचें वाहन नसलेलें) कोणतेंहि मोटार वाहन, किंवा अशा रीतीनें तयार केलेलें किंवा सुयोग्य करून घेतलेलें नसून जे सर्वस्वी मालाच्या वाहतुकीसाठीं किंवा उतारूंच्या वाहतुकीशिवाय आणखी मालाच्या वाहतुकीसाठीं वापरण्यांत येत असेल (असा माल हा,अशा वाहनाच्या मालकाची मालमत्ता असली पाहिजे आणि वाहतुकीचीं साधनें पुरविणें हा त्याचा धंदा नसतांना त्याची वाहतूक करणें त्या मालकाच्या धंद्याच्या कारणासाठीं आवश्यक आहे असा माल असेल) असें कोणतेंहि मोटार वाहन किंवा मोटार वाहन अधिनियम, १९३९ याच्या कलम ४२, पोट-कलम (२) मध्यें निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि कारणांसाठीं वापरण्यांत येत असेल असें वाहन, असा समजावा ;

(इ) "मालाचें सार्वजनिक वाहन" ह्या संज्ञेचा अर्थ, मालाच्या वाहतुकीसाठीं उपयोग करण्याकरितां तयार केलेलें किंवा सुयोग्य करून घेतलेलें कोणतेंहि मोटार वाहन, किंवा अशा रीतीनें तयार केलेलें किंवा सुयोग्य करून घतलेलें नसून जें सर्वस्वी मालाच्या वाहतुकीसाठीं किंवा उतारूंच्या वाहतुकीशिवाय आणखी, मालाच्या वाहतुकीसाठीं भाडें घेऊन किंवा बक्षीस घेऊन वापरण्यांत येत असेल असें कोणतेंहि मोटार वाहन, असा समजावा ;

(फ) "कर" ह्या संज्ञेचा अर्थ, कलम ३ किंवा ४ कलम अन्वयें बसविण्यांत आलेला कर, असा समजावा आणि त्यांत, कलम ११ अन्वयें भरलेल्या ठोक रकमेचा समावेश होतो ;

(ग) "कर आकारणी प्राधिकारी" ह्या संज्ञेचा अर्थ, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ अन्वयें असा प्राधिकारी म्हणून नियुक्त केलेला अधिकारी किंवा प्राधिकारी, असा समजावा ;

(ह) ह्या अधिनियमांत वापरलेले परंतु व्याख्या न दिलेले शब्द व शब्दप्रयोग ह्यांचा अर्थ, मोटार वाहन अधिनियम, १९३९ व तदन्वयें केलेले नियम यांत त्यांना जो अर्थ दिलेला असेल तोच असेल.

सार्वजनिक मालाच्या वाहनांतून नेण्यांत येणाऱ्या मालावरील कर.

३. ह्या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, सार्वजनिक मालाच्या वाहनांतून रस्त्यावरून वाहून नेण्यांत येणाऱ्या सर्व मालावर, राज्य सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून ठरवील अशा तारखेपासून व अशा दरानें कर बसविण्यांत व वसूल करण्यांत येईल ; असा दर हा अशा वाहनांतून नेण्यांत येणाऱ्या मालावर जें भाडें आकारण्यांत आलें असेल त्या भाड्याच्या रकमेच्या शेंकडा दोन टक्क्याहून कमी व शेंकडा पांच टक्क्यांहून अधिक असणार नाहीं.

खाजगी मालाच्या वाहनांतून नेण्यांत येणाऱ्या मालावरील कर.

४. या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, खाजगी मालाच्या वाहनांतून रस्त्यावरून वाहून नेण्यांत येणाऱ्या सर्व मालावर सुद्धां राज्य-सरकार राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून ठरवील अशा तारखेपासून व अशा दरानें कर बसविण्याचा व वसूल करण्याचा अधिकार असेल ; असा दर हा दर किलोमिटरला दर मेट्रिक टनांस तीन दशांस नया पैशांहून कमी व दर किलोमिटरला दर मेट्रिक टनांस सहा दशांस नया पैशांहून अधिक असणार नाहीं.

**कलम ३ किंवा कलम ४ अन्वयें बसविण्यांत आलेला कर वसूल करणें व मोजणें.**

५. (१) कलम ३ अन्वयें बसविण्यांत आलेला कर चालकानें आकारलेल्या वाहतुकीच्या भाड्याबरोबरच त्यानं वसूल केला पाहिजे ; आणि अशा रीतीनें वसूल केलेला कर आणि कलम ४ अन्वयें बसविलेला कर, कोणताहि असल्यास, प्रत्येक बाबतींत, ह्या अधिनियमाच्या उपबंधानुसार राज्य-सरकारला देण्यांत आला पाहिजे.

(२) जेव्हां राज्याबाहेरील कोणत्याहि ठिकाणाहून राज्यांतील कोणत्याहि ठिकाणीं किंवा राज्यांतील कोणत्याहि ठिकाणाहून राज्याबाहेरील कोणत्याहि ठिकाणीं मालाच्या वाहनांतून कोणताहि माल नेण्यांत आला असेल किंवा राज्याबाहेरील एका ठिकाणाहून राज्याबाहेरील दुसऱ्या ठिकाणीं मालाच्या वाहनांतून कोणताहि माल नेण्यांत आला असेल परंतु तो माल राज्यांतून जाणाऱ्या रस्त्यावरून नेण्यांत आला असेल तर, असा माल ज्या रस्त्यावरून नेण्यांत आला त्या रस्त्याचा जेवढा भाग राज्यांत समाविष्ट असेल तेवढ्या भागाच्या संबंधांतच फक्त कर देण्यांत आला पाहिजे ; आणि जर, वाहतुकीच्या भाड्याच्या दर शेंकडा प्रमाणांत कराचा हिशेब करावयाचा असेल व अशा रस्त्याचा जेवढा भाग राज्यांत समाविष्ट आहे त्या भागाच्या संबंधांत स्वतंत्रपणें कोणतेंहि वाहतूक भाडें आकारलें नसेल तर, राज्यांत जितक्या अंतरापर्यंत वाहतूक करण्यांत आली तितक्या अंतराचें एकूण वाहतुकीच्या अंतराशीं जें प्रमाण असेल त्या प्रमाणानुसार एकूण वाहतूक भाड्यामधून जितकें वाहतूक भाडें आकारतां येईल तितक्या वाहतूक भाड्यावर कराचा हिशेब केला पाहिजे.

(३) रस्त्यावरून नेण्यांत येणाऱ्या मालाच्या बाबतींत, जेव्हां महाराष्ट्र सरकार व इतर राज्य-सरकार यांच्या दरम्यान रस्त्यावरून नेण्यांत येणाऱ्या मालावर कर आकारणी करण्याच्या संबंधांत कोणतीहि परस्पर व्यवस्था करण्यांत आली असेल तेव्हां, या अधिनियमांत कांहींहि असलें तरी, कराची आकारणी व वसुली ही अशा परस्पर व्यवस्थेच्या अटी व शर्तींनुसार करण्यांत आली पाहिजे :

परंतु, अशा कोणत्याहि व्यवस्थेनुसार आकारण्यांत येणारा व देण्याजोगा कर हा, या अधिनियमान्वयें आकारण्याजोग्या व देण्याजोग्या असलेल्या करापेक्षां अधिक होतां कामा नये :

तसेंच, अशा प्रत्येक परस्पर व्यवस्थेच्या अटी व शर्ती राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आल्या पाहिजेत व त्यांची एक प्रत राज्य विधानमंडळाच्या दोन्हीं सभागृहांसमोर ठेवण्यांत आली पाहिजे.

(४) ह्या कलमाअन्वयें कराचा हिशेब करतांना रुपयाच्या, पांच नया पैशाहून कमी असलेल्या किंवा पांच नया पैशांचा गुणांक नसलेल्या भागाचें पांच नया पैशांत किंवा यथास्थिति पांच नया पैशाच्या नंतरच्या गुणांकांत रुपांतर करण्यांत आलें पाहिजे.

**पत्रकें सादर करणें.**

६. चालविण्यांत येणाऱ्या प्रत्येक मालाच्या वाहनाच्या बाबतींत, चालकानें, आकारणी करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे एक पत्रक सादर केलें पाहिजे ; असें पत्रक हें विहित करण्यांत येईल त्या मुदतीचें असलें पाहिजे आणि त्यांत विहित करण्यांत येईल तो तपशील विहित केलेल्या नमुन्यांत दिला पाहिजे; तसेंच असें पत्रक विहित करण्यांत येईल त्या तारखेस सादर करण्यांत आलें पाहिजे व त्यावर विहित केलेल्या रीतीनें प्रामाण्यलेख करून दिला पाहिजे, तसेंच, चालकानें, अशा पत्रकासोबत, या अधिनियमान्वयें त्याजकडून येणें असलेली कराची रक्कम म्हणून जी कोणतीहि रक्कम अशा पत्रकांत निर्दिष्ट करण्यांत आली असेल ती संपूर्ण रक्कम कर आकारणी प्राधिकाऱ्यास दिली पाहिजे.

**योग्य तारखेनंतर सादर केलेलें पत्रक व पत्रकाची सुधारणा.**

७. कलम ६ अन्वयें पत्रक सादर केल्यानंतर चालकास असें आढळून आलें असेल कीं, अशा पत्रकांत कोणतीहि गोष्ट नमूद करण्याचें राहून गेलें आहे किंवा त्यांत कोणतेंहि चुकीचें निवेदन करण्यांत आलें आहे तर, त्यास, कराच्या रकमेची आकारणी करण्यांत येण्यापूर्वीं कोणत्याहि वेळीं, सुधारलेलें पत्रक सादर करण्याचा अधिकार असेल.

करांची आकारणी

८. (१) कर आकारणी प्राधिकाऱ्याजवळ उपलब्ध असलेल्या गोष्टींवरून त्याची अशी खात्री झाली असेल कीं, कलम ६ किंवा कलम ७ अन्वयें सादर करण्यांत आलेलें पत्रक किंवा सुधारलेलें पत्रक हें बिनचूक व पूर्ण आहे तर त्यानें, ज्या मुदतीसाठीं पत्रक सादर करण्यांत आलें असेल त्या मुदतीसंबंधानें चालकानें राज्य-सरकारला द्यावयाच्या कराच्या रकमेची आकारणी करण्याचें काम सुरू केलें पाहिजे.

(२) जर कर आकारणी प्राधिकाऱ्याची अशारीतीनें खात्री झाली नाहीं तर, त्यास, अशा चालकावर एक नोटिस बजावून, त्या नोटीशीद्वारें, त्यास अशा नोटिशींत निर्दिष्ट करण्यांत येईल त्या तारखेस आपल्या कार्यालयांत जातीनें हजर राहण्याविषयीं किंवा त्यानें सादर केलेल्या पत्रकाच्या समर्थनार्थ त्याची ज्या पुराव्यावर भिस्त असेल असा कोणताहि पुरावा उक्त तारखेस सादर करण्याविषयीं किंवा सादर करण्याची व्यवस्था करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

(३) या अधिनियमान्वयें चालकानें द्यावयाच्या कराच्या रकमेची आकारणी ठरविण्याच्या कारणांसाठीं, कर आकारणी प्राधिकाऱ्यास, चालकावर एक नोटीस बजावून, त्या नोटिशीद्वारें, त्यास नोटिशींत निर्दिष्ट करण्यांत येईल त्या तारखेस कर आकारणी प्राधिकाऱ्यास आवश्यक असतील असे हिशोब, कागदपत्रें व इतर दस्तऐवज हजर करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

(४) चालक जो पुरावा हजर करील त्याचा किंवा कर आकारणी प्राधिकाऱ्यास आवश्यक असेल अशा इतर पुराव्यांचा विचार केल्यानंतर, कर आकारणी प्राधिकाऱ्यानें, लेखी आदेशाद्वारें, चालकाकडून येणें असलेल्या कराच्या रकमेची आकारणी केली पाहिजे.

आपल्या उत्तम न्यायबुद्धीनुसार कराची आकारणी करण्याचा कर आकारणी प्राधिकाऱ्याचा अधिकार.

९. कलम ६ अन्वयें पत्रक सादर करण्यांत किंवा निकटपूर्वीच्या कलमाचें पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) अन्वयें दिलेल्या कोणत्याहि नोटिशीच्या शर्तींचें पालन करण्यांत कोणताहि चालक कसूर करील तर, कर आकारणी प्राधिकाऱ्यास, आपल्या उत्तम न्यायबुद्धीनुसार, द्यावयाच्या ज्या मुदतीसाठीं चालकानें पत्रक सादर करावयास पाहिजे होतें त्या मुदतीसंबंधानें त्यानें कराच्या रकमेची आकारणी करण्याचा अधिकार आहे.

आकारणींतून सुटलेला कर.

१०. या अधिनियमान्वयें कोणत्याहि मुदतीसंबंधानें आकारतां येईल अशा कराची रक्कम असे आकारणींतून सुटून गेल्याचें कर आकारणी प्राधिकाऱ्यास सकारण वाटत असेल तर, त्यास, अशी मुदत समाप्त झाल्यावर पांच वर्षांच्या मुदतींत कोणत्याहि वेळीं चालकावर एक नोटीस बजावून त्या नोटिशीद्वारें त्या चालकास अशा नोटिशींत निर्दिष्ट करण्यांत येईल अशी माहिती (त्यांत कलम ६ अन्वयें सादर करावयाचें कोणतेंहि पत्रक समाविष्ट असेल) पुरविण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे ; आणि त्या प्राधिकाऱ्यानें त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्यास अशा रीतीनें आकारणींतून सुटून गेलेल्या कराच्या रकमेची आकारणी करण्याचा अधिकार आहे आणि अशा प्रसंगीं जणू चालकानेंच कलम ६ किंवा यथास्थिति कलम ७ अन्वयें पत्रक सादर केलें आहे असें समजून या अधिनियमाचे इतर उपबंध शक्य असेल तेथवर त्या बाबतींत लागू होतील.

कराची ठोक रक्कम देणें.

११. (१) या अधिनियमांत इतरत्र कांहींहि असलें तरी, कोणत्याहि चालकास आपल्या मर्जीनुसार कोणत्याहि कालावधीच्या संबंधांत (म्हणजे दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या बारा महिन्यांचा कालावधीच्या किंवा तो प्रथमच कर देण्यास पात्र झाला असेल तर, त्यानंतरच्या दिनांक ३१ मार्चला संपणाऱ्या कोणत्याहि कालावधीच्या संबंधांत) या अधिनियमाच्या पूर्ववर्ती उपबंधान्वयें त्यानें द्यावयाच्या कराच्या रकमेऐवजीं, वाहनाची माल वाहून नेण्याची शक्ति (म्हणजे ओझें लादलेलें असतां होणारें नोंदलेलें वजन व ओझें लादलेलें नसतां होणारें वजन यांतील फरक) विचारांत घेऊन राज्य-सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारा जी ठोक रक्कम निश्चित करील त्या रकमेंत त्यानें भरणा

करण्याबाबत त्यास परवानगी देण्यासाठीं कर आकारणी प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे. परंतु, कोणत्याहि बाबतींत अशी रक्कम ही प्रत्येक सार्वजनिक मालाच्या वाहनावर दर महिन्यास एकशें वीस रुपयांहून अधिक व प्रत्येक खाजगी मालाच्या वाहनांवर दर महिन्यास साठ रुपयांहून जास्त असतां कामा नये. असा अर्ज करण्यांत आल्यानंतर कर आकारणी प्राधिकाऱ्यानें अशी परवानगी दिली पाहिजे.

(२) निकटपूर्वीच्या शेवट पोट-कलमान्वयें करावयाचा अर्ज हा ज्या कालावधीकरितां ठोक रक्कम द्यावयाची असेल त्या कालावधीच्या प्रारंभापूर्वी तीस दिवसांहून कमी नाहीं इतके दिवस आधीं किंवा लेखी नमूद करावयाच्या कारणासाठीं कर आकारणी प्राधिकारी परवानगी देईल अशा इतर वाजवी कालांत केला पाहिजे.

१२. (१) या अधिनियमाच्या पूर्ववर्ती उपबंधान्वयें आकारलेली कराची रक्कम (पत्रकाबरोबर कोणताहि कर, भरलेला असल्यास, तो विचारांत घेऊन) विहित करण्यांत येईल अशा तारखेस किंवा तारखांस व अशा रीतीनें चालकानें कर आकारणी प्राधिकाऱ्याकडे भरली पाहिजे. **कराचा भरणा व करासंबंधी प्रमाणपत्र देणें.**

(२) निकटपूर्वीच्या पोट-कलमान्वयें रक्कम भरण्यांत आल्यानंतर, कर आकारणी प्राधिकाऱ्यानें विहित केलेल्या नमुन्यांत कर भरण्यांत आल्याबद्दलचें प्रमाणपत्र, ज्या कालावधीकरितां कर भरण्यांत आलेला आहे तो कालावधि नमूद करून कर देणाऱ्या चालकास दिलें पाहिजे; आणि तें ज्या मालाच्या वाहनाशीं संबंधित असेल त्या वाहनाबरोबर किंवा विहित करण्यांत येईल अशा इतर रीतीनें हें प्रमाणपत्र नेणें किंवा नेण्याची व्यवस्था करणें हें चालकाचें कर्तव्य असेल.

(३) कोणत्याहि मालाच्या वाहनाच्या संबंधांत कर भरण्यांत आल्याबद्दलचें प्रमाणपत्र पूर्वीच देण्यांत आलें असेल तर, कर आकारणी प्राधिकाऱ्यांनें वर सांगितल्याप्रमाणें कर दिल्यानंतर तो अशा रीतीनें भरण्यांत आल्यासंबंधींची नोंद प्रमाणपत्रांत करविली पाहिजे.

१३. (१) कोणताहि कर किंवा दंड किंवा या दोन्हीहि प्रकारच्या रकमा, या अधिनियमाच्या उपबंधान्वयें देणें असतील तर कर आकारणी प्राधिकाऱ्यानें राज्य-सरकारास अशा प्रकारें द्यावयाची रक्कम व ज्या कालावधींत ती भरली पाहिजे तो कालावधि निर्दिष्ट करणारी एक मागणीची नोटीस विहित केलेल्या नमुन्यांत चालकावर बजावली पाहिजे. **कराची वसुली वगैरे.**

(२) मागणीच्या नोटिशींत देणें म्हणून असलेली जी कोणतीहि रक्कम नमूद केली असेल अशी रक्कम नोटिशींत नमूद केलेल्या कालावधींत दिली नाहीं तर, कर आकारणी प्राधिकाऱ्यास, ज्या जिल्ह्यांत चालक रहात असेल किंवा त्याच्या धंद्याचें कायम ठिकाण असेल त्या जिल्ह्याच्या कलेक्टरकडे चालकांकडून येणें असलेली बाकी रक्कम निर्दिष्ट करणारे व त्याच्या सहीनिशीं असलेलें एक प्रमाणपत्र पाठविण्याचा अधिकार आहे, आणि असें प्रमाणपत्र मिळाल्यानंतर कलेक्टरनें त्यांत निर्दिष्ट केलेली रक्कम, जमीनमहसुलाची थकबाकी असल्याप्रमाणें चालकाकडून वसूल करण्याबाबत उपाययोजना केली पाहिजे :

परंतु, राज्य-सरकारच्या किंवा राज्य-सरकारकडून या बाबतींत अधिकृत करण्यांत येईल अशा अधिकाऱ्याच्या विनंतीखेरीज किंवा संमतिखेरीज या पोट-कलमास अनुसरून कोणतीहि जप्ती करतां कामा नये.

(३) पोट-कलम अन्वयें करावयाची जप्ती राज्य-सरकार सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें निदेश देईल अशा अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्याच्या वर्गास देखील करण्याचा अधिकार आहे ; आणि अशी कोणतीहि जप्ती करणाऱ्या अधिकाऱ्यानें त्यासंबंधीचें कामकाज जप्त केलेल्या वस्तूंसह पोट-कलम (२) अन्वयें पुढील उपाययोजनेकरितां कलेक्टरकडे पाठविलें पाहिजे.

१४. (१) कलम १३ अन्वयें त्याच्यावर बजावण्यांत आलेल्या मागणीच्या नोटिशीस हरकत घेणाऱ्या कोणत्याहि चालकास ती बजावल्यापासून तीस दिवसांच्या आंत विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अपील करण्याचा अधिकार असेल : **अपील.**

परंतु, अपील करणाऱ्याकडून कराची जी रक्कम येणें आहे असें गृहीत धरण्यांत आलें असेल ती रक्कम दिल्याबाबतचा समाधानकारक पुरावा अपिलास जोडल्यावाचून कोणतेंहि अपील स्वीकारलें जाणार नाहीं.

(२) विहित करण्यांत येतील अशा कार्यरीतीच्या नियमांस अधीन राहून विहित केलेल्या प्राधिकाऱ्यास, अपील करणाऱ्यास आपली बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर अपिलावर अशा अधिकाऱ्यास जो न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देण्याचा अधिकार आहे.

रतपासणी.

१५. (१) राज्य-सरकारला (किंवा राज्य-सरकारनें याबाबतींत नामोद्दिष्ट केलेल्या सरकारच्या उप-सचिवाच्या दर्जापेक्षां कमी दर्जा नसेल अशा अधिकाऱ्यास), स्वतः होऊन किंवा अर्ज करण्यांत आला असतां, या अधिनियमान्वयें कोणत्याहि अधिकाऱ्यानें किंवा प्राधिकाऱ्यानें दिलेल्या कोणत्याहि आदेशाचे कागदपत्र मागविण्याचा व तपासण्याचा व तसेंच त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा त्यासंबंधीं आदेश देण्याचा अधिकार आहे :

परंतु, या कलमान्वयें केलेला कोणताहि अर्ज, जर तो आदेशाच्या तारखेपासून चार महिन्यांच्या मुदतीच्या आंत करण्यांत आला नसेल तर, स्वीकारतां कामा नये :

तसेंच, अशा कोणत्याहि आदेशाच्या फेरतपासणीसाठीं केलेला कोणताहि अर्ज नाकारण्यापूर्वी, राज्य-सरकारनें किंवा नामोद्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यानें, अर्ज कां नाकारण्यांत आला याबद्दलचीं कारणें नमूद केलीं पाहिजेत.

(२) ज्यामुळें कोणत्याहि इसमाचें नुकसान होण्याचा संभव असेल असा कोणताहि आदेश या कलमान्वयें देण्यापूर्वी राज्य-सरकारनें किंवा यथास्थिति नामोद्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यानें अशा इसमास आपली बाजू मांडण्याची संधि दिली पाहिजे.

(३) जेव्हां एखाद्या चालकास कलम १४ अन्वयें अपील करतां आलें असतें व त्यानें कोणतेंहि अपील दाखल केलें नसेल तेव्हां, अशा चालकानें अर्ज केल्यावर या कलमान्वयें फेरतपासणीचें कोणतेंहि कामकाज चालवितां कामा नये.

ट देणें, जावट रणें, क्कम परत रणें, वगैरे.

१६. (१) राज्य-सरकारला नियमांद्वारें, अशी तरतूद करण्याचा अधिकार आहे कीं, अशा नियमांत विहित करण्यांत येईल अशा परिस्थितींत व विहित करण्यांत येतील अशा शर्तींस अधीन राहून, कलम ३ किंवा कलम ४ अन्वयें बसविलेल्या आणि वसूल केलेल्या सर्व कराची किंवा त्याच्या कोणत्याहि भागाची त्या नियमांत निर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्यानें चालकास सूट द्यावी, वजावट करावी किंवा त्याची रक्कम परत करावी. मात्र असें करतांना वाहून नेण्यांत येणाऱ्या मालाचें स्वरूप, माल ज्या ठिकाणीं व ज्या कारणासाठीं नेण्यांत येत असेल तें ठिकाण व तें कारण आणि विहित करण्यांत येतील अशा इतर गोष्टी (कोणत्याहि असल्यास) विचारांत घेतल्या पाहिजेत.

(२) कर आकारणी प्राधिकाऱ्यानें एखाद्या चालकाकडून येणें असलेल्या रकमेहून त्यानें अधिक भरलेल्या करांची व दंडाची (कांहीं असल्यास) रक्कम, विहित करण्यांत येईल अशा रीतीनें, अशा चालकास परत दिली पाहिजे. परत द्यावयाची अशी रक्कम, रोख रकमेच्या स्वरूपांत किंवा अशा चालकाच्या मर्जीनुसार दुसऱ्या कोणत्याहि मुदतीबद्दल देणें असलेल्या कराच्या किंवा दंडाच्या (कांहीं असल्यास) रकमेंतून अशी अधिक रक्कम वजा करून, दिली पाहिजे :

परंतु, कर आकारणी प्राधिकाऱ्यानें प्रथमतः अशा अधिक रकमेचा विनियोग, ज्या कोणत्याहि रकमेच्या संबंधांत कलम १३ अन्वयें अशा चालकावर नोटीस बजावण्यांत आली असेल ती रक्कम वसूल करण्यासाठीं केला पाहिजे व नंतर शिल्लक राहिलेली रक्कम (कांहीं असल्यास) परत दिली पाहिजे.

हशोब व नोंदणीपुस्तकें. वणें.

१७. या अधिनियमान्वयें कर देण्यास पात्र असलेल्या प्रत्येक चालकानें विहित करण्यांत येतील अशीं नोंदणीपुस्तकें, व त्यानें धारण केलेल्या मालाच्या वाहनांतून नेण्यांत येणाऱ्या मालाच्या संबंधांत द्यावयाच्या कराच्या रकमेचा बिनचूक हिशोब विहित करण्यांत येईल अशा नमुन्यांत ठेवला पाहिजे व सुस्थितींत राखला पाहिजे.

हिशोब हजर करण्याचा आदेश देण्याचा अधिकार.

१८. कर आकारणी प्राधिकाऱ्यास किंवा राज्य सरकारनें याबाबतींत अधिकार दिलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास, आदेशाद्वारें, कर आकारणी करण्यासाठीं किंवा या अधिनियमाच्या कोणत्याहि कारणांसाठीं, अशा आदेशांत निर्दिष्ट करण्यांत येतील असे हिशोब, नोंदणीपुस्तकें व कागदपत्रें त्याजपुढें हजर करण्यास व कोणत्याहि मालाच्या वाहनांतून नेण्यांत आलेल्या माला-संबंधीं किंवा त्यांतून नेण्यांत आलेल्या मालाच्या संबंधांत वसूल केलेल्या करासंबंधीं आदेशांत विहित करण्यांत येईल अशी माहिती पुरविण्यास कोणत्याहि चालकास भाग पाडण्याचा अधिकार आहे.

प्रवेश व तपासणी करण्याचे अधिकार.

१९. (१) राज्य सरकारनें या बाबतींत अधिकृत केलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास, या अधिनियमाच्या किंवा तदन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमांच्या उपबंधांचें पालन होत आहे किंवा नाहीं हें पाहण्याच्या किंवा पडताळून पाहण्याच्या कारणासाठीं कोणत्याहि मालाच्या वाहनांत व असें वाहन ठेवण्यासाठीं चालक गॅरेज म्हणून किंवा माल सांठविण्यासाठीं किंवा त्याच्या धंद्याचे हिशोब ठेवण्यासाठीं सामान्यपणें वापरीत असेल अशा कोणत्याहि जागेंत सर्व वाजवी वेळीं प्रवेश करण्याचा; अशा वाहनाची व जागेची तपासणी करण्याचा व झडती घेण्याचा, आणि या अधि-नियमाच्या कारणासाठीं त्यास आवश्यक वाटतील अशा कोणत्याहि हिशोबांच्या किंवा कागदपत्रांच्या प्रती किंवा त्यामधील उतारे घेण्याचा किंवा घेण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें घ्यावयाच्या सर्व झडत्या दंड प्रक्रिया संहिता, १८९८ च्या उपबंधांनुसार घेण्यांत आल्या पाहिजेत.

कर न भरण्याबद्दल दंड.

२०. जर एखाद्या चालकानें या अधिनियमाच्या उपबंधान्वयें किंवा तदनुसार त्यानें ज्या मुदतींत कर भरणें आवश्यक असेल त्या मुदतीच्या आंत, वाजवी कारणावांचून कर भरला नाहीं तर, तो कराच्या रकमेशिवाय आणखी त्याच्या २५ टक्क्यांहून अधिक नसेल इतकी रक्कम दंडा-दाखल देण्यास पात्र होईल.

अपराध व शिक्षा आणि सक्षम न्यायालय.

२१. (१) जो कोणताहि इसम—

(अ) चालक असून, चुकीचें किंवा अपूर्ण पत्रक सादर करील किंवा सादर करूं देईल किंवा सादर करावयास लावील अथवा या अधिनियमाच्या उपबंधान्वयें किंवा तदनुसार आवश्यक असल्याप्रमाणें पत्रक सादर करण्यांत कसूर करील ; अथवा

(ब) चालक असून, त्याजकडून येणें असलेला कोणताहि कर देण्याचें लबाडीनें चुकवील किंवा चुकवूं देईल ; अथवा

(क) चालक असून, सादर केलेल्या कोणत्याहि विवरणपत्रकांत, किंवा कोणत्याहि हिशोबांत किंवा नोंदणीपुस्तकांत लबाडीनें कोणतीहि चुकीची नोंद करील किंवा करावयास लावील किंवा करूं देईल किंवा त्यामधून लबाडीनें कोणतीहि नोंद वगळील किंवा वगळावयास लावील किंवा वगळूं देईल ; अथवा

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याहि उपबंधांचें किंवा त्या अन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमांचें किंवा तदनुसार देण्यांत आलेल्या कोणत्याहि वैध आदेशांचें जाणूनबूजून उल्लंघन करील,

त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल, आणि फौजदारी न्यायाधिशानें आपल्या आदेशांत तसा निदेश दिल्यास, दोषी ठरविण्यांत आलेल्या इसमानें देण्याचें चुकविलेली रक्कम म्हणून फौजदारी न्यायाधीश ठरवील अशी निर्दिष्ट केलेली रक्कम, जणूं कांहीं तो दंड आहे असें समजून, दोषी ठरविण्यांत आलेल्या अशा इसमानें त्याशिवाय आणखी दिली पाहिजे.

(२) प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधिशाच्या किंवा दुसऱ्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाच्या न्यायालयाहून कनिष्ठ दर्जाच्या कोणत्याहि न्यायालयानें, या अधिनियमान्वयें शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याहि अपराधाची चौकशी किंवा न्याय चौकशी करतां कामा नये.

**कंपन्यांनीं केलेले अपराध.**

२२. (१) जेव्हां ह्या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीनें केला असेल तेव्हां, तो अपराध घडला त्यावेळीं कंपनी ज्या इसमाच्या स्वाधीन होती व कंपनीचें कामकाज चालवण्यास जो जबाबदार होता तो प्रत्येक इसम व तसेंच ती कंपनी हीं त्या अपराधाबद्दल दोषी आहेत असें समजलें जाईल व त्याप्रमाणें त्याजविरुद्ध कारवाई केली जाण्यास व शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असतील:

परंतु, जर असा कोणताहि इसम, तो अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडूं नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असें सिद्ध करील तर, ह्या पोट-कलमांतील कोणत्याहि मजकुरामुळें तो ह्या अधिनियमांत तरतूद करण्यांत आलेल्या कोणत्याहि शिक्षेस पात्र ठरणार नाहीं.

(२) पोट-कलम (१) मध्यें कांहींहि असलें तरी, ह्या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीनें केला असेल व तो अपराध कंपनीचा कोणताहि संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीनें किंवा त्यानें दुर्लक्ष केल्यामुळें किंवा त्यानें उपेक्षा केल्यामुळें घडला आहे असें सिद्ध होईल तर, असा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी हा देखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असें समजलें पाहिजे व त्याप्रमाणें त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व शिक्षा दिली जाण्यास तो पात्र होईल.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या कारणांकरितां—

(अ) "कंपनी" या संज्ञेचा अर्थ एकव्यक्तिभूत संस्था असा समजावा व तींत पेढीचा किंवा व्यक्तींच्या इतर संघाचा समावेश होतो ; आणि

(ब) एखाद्या पेढीच्या संबंधांत "संचालक" या संज्ञेचा अर्थ त्या पेढींतील भागीदार असा समजावा.

**अपराधां-संबंधीं तडजोड करणें.**

२३. (१) कलम २१ अन्वयें शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याहि अपराधाबद्दल कारवाई दाखल करण्यापूर्वी किंवा त्यानंतर, कर आकारणी प्राधिकाऱ्यास, असा अपराध केल्याचा आरोप ठेवण्यांत आलेल्या कोणत्याहि इसमाकडून, अशा अपराधासंबंधीं तडजोड म्हणून अशा रीतीनें वसूल करावयाच्या कराच्या रकमेशिवाय आणखी, जेव्हां असा अपराध हा कर देण्याचें चुकविण्या-च्या स्वरूपाचा असेल तेव्हां, वसूल करावयाच्या कराच्या रकमेच्या दुपटीहून अधिक नसेल अशी रक्कम ; आणि इतर कोणत्याहि बाबतींत अडीचशें रुपयांहून अधिक नसेल अशी रक्कम स्वीकार-ण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें कर आकारणी प्राधिकारी ठरवील अशी रक्कम भरण्यांत आल्यावर, अशा इसमाविरुद्ध अशा अपराधाच्या संबंधांत कोणतीहि कारवाई दाखल करण्यांत आली असेल तर, अशा रीतीनें केलेल्या तडजोडीमुळें असा इसम दोषमुक्त झाला आहे असें समजलें पाहिजे, व अशा इसमाविरुद्ध त्याच अपराधाच्या संबंधांत आणखी कोणतीहि कारवाई चालवितां कामा नये.

**अधिकार सोंपविणें.**

२४. राज्य सरकारला, साहाय्यक विभागीय वाहतूक अधिकाऱ्याहून कमी दर्जाच्या नसलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्याकडे, या अधिनियमान्वयें किंवा तदनुसार कर आकारणी प्राधिकाऱ्यास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांपैकीं सर्व किंवा कोणतेहि अधिकार सोंपविण्याचा अधिकार आहे.

**अधिकारी लोकसेवक असणें.**

२५. या अधिनियमान्वयें काम करणारे सर्व अधिकारी हे भारतीय दण्ड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असें समजलें पाहिजे.

२६. (१) या अधिनियमान्वयें केलेल्या किंवा करण्याचा आशय असेल अशा कोणत्याहि कृत्याबद्दल, सरकारच्या कोणत्याहि अधिकाऱ्याविरुद्ध किंवा सेवकाविरुद्ध राज्य सरकारच्या परवानगीवांचून कोणत्याहि फौजदारी न्यायालयांत कोणताहि खटला किंवा इतर कामकाज दाखल करतां कामा नये. विवक्षित कामकाजास मनाई.

(२) या अधिनियमान्वयें किंवा तदनुसार लादण्यांत आलेल्या कर्तव्यांची अंमलबजावणी करतांना किंवा लादण्यांत आलेलीं कामें पार पाडतांना असें कोणतेंहि कृत्य हें सद्भावनापूर्वक करण्यांत आलेलें असेल तर, कोणत्याहि दिवाणी किंवा फौजदारी कामकाजांत अशा कोणत्याहि कृत्याबद्दल सरकारचा कोणताहि अधिकारी किंवा सेवक जबाबदार असणार नाहीं.

२७. या अधिनियमान्वयें केलेल्या किंवा जें करण्याचा आशय आहे अशा कोणत्याहि कृत्याच्या संबंधांत राज्याविरुद्ध कोणताहि दावा किंवा इतर कामकाज आणि तसेंच सरकारच्या कोणत्याहि अधिकाऱ्याविरुद्ध किंवा सेवकाविरुद्ध कोणताहि दावा, खटला किंवा इतर कामकाज हें, ज्या कृत्याविषयीं तक्रार करण्यांत आली असेल तें कृत्य घडल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आंत दाखल करण्यांत आलेलें नसेल तर, असा कोणताहि दावा, खटला किंवा कामकाज चालवितां येणार नाहीं. दावे व खटले दाखल करण्याची मुदत.

२८. (१) राज्य-सरकारला, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें,— विवक्षित मालाच्या बाबतींत कर भरण्याची माफी देण्याचा अधिकार.

(अ) अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा आंतर-राज्य मार्गांवरून वाहून नेण्यांत येणाऱ्या मालाच्या बाबतींत, किंवा

(ब) कोणत्याहि शैक्षणिक, वैद्यकीय, लोक कल्याणाच्या किंवा तत्सम हेतूस सहाय्यभूत होण्यासाठीं वाहून नेण्यांत येणाऱ्या मालाच्या बाबतींत, किंवा

(क) अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा परिस्थितींत (ज्या कोणत्याहि मालाच्या वाहनाच्या संबंधांत कराची ठोक रक्कम देण्याबाबत परवानगी दिली असेल अशा वाहनाचा उपयोग न करणें ही गोष्ट धरून), त्या मुदतीसाठीं आणि तींत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा अटींवर व शर्तींवर वाहून नेण्यांत आलेल्या मालाच्या संबंधांत चालकास,—

कर भरण्याची सर्वस्वी किंवा अंशतः माफी देण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें काढण्यांत आलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यांत आल्यावर शक्य तितक्या लवकर, महाराष्ट्र विधान सभेपुढें ठेवण्यांत आली पाहिजे आणि अशा रीतीनें ती अधिसूचना ज्या अधिवेशनांत महाराष्ट्र विधान सभेपुढें ठेवण्यांत आली असेल त्या अधिवेशनांत ती विधानसभा त्या अधिसूचनेंत जे फेरफार करील व राजपत्रांत प्रसिद्ध करील त्या फेरफारांस अधीन असेल.

२९. (१) राज्य-सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे. नियम करण्याचा अधिकार

(२) विशेषेंकरून आणि वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां पुढील गोष्टींची तरतूद करण्याकरितां नियम करतां येतील. म्हणजे,—

(अ) कलम ६ अन्वयें ज्या नमुन्यांत आणि ज्या तारखेपर्यंत पत्रकें पुरविण्यांत येतील तो नमुना व ती तारीख आणि ज्या रीतीनें त्यांची तपासणी करण्यांत येईल ती रीत ;

(ब) ह्या अधिनियमान्वयें देणें असलेली कराची रक्कम ही कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वयें चालकानें ज्या तारखेपूर्वी किंवा तारखांपूर्वीं दिली पाहिजे ती तारीख किंवा त्या तारखा आणि पोट-कलम (२) अन्वयें कर दिल्याबद्दलच्या प्रमाणपत्राचा नमुना व असें प्रमाणपत्र नेण्याची रीत;

(क) कलम १३ अन्वयें बजाविण्यांत येणाऱ्या मागणीच्या नोटिशीचा नमुना ;

(ड) कलम १४ अन्वयें ज्या प्राधिकाऱ्याकडे अपील करतां येईल तो प्राधिकारी व उक्त कलमान्वयें अशा प्राधिकाऱ्यानें जी कार्यपद्धति अनुसरली पाहिजे ती कार्यपद्धति ;

(ई) कलम १६ च्या पोट-कलम (१) अन्वयें ज्या परिस्थितींत व ज्या अटींवर कराची सूट देतां येईल, बजावट करतां येईल किंवा त्याची रक्कम परत करतां येईल ती परिस्थिति व त्या अटी निर्दिष्ट करणें व विहित करावयाच्या इतर कोणत्याहि गोष्टी आणि पोट-कलम (२) अन्वयें चालकानें भरलेली कराची रक्कम व दंड (कोणताहि असल्यास) परत करण्याची रीत ;

(फ) कलम १७ अन्वयें नोंदणीपुस्तकें व करासंबंधींचे बिनचूक हिशेब हे ज्या नमुन्यांत ठेवण्यांत येतील तो नमुना ;

(ग) ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या अधिकाऱ्याचीं कर्तव्यें व अधिकार ;

(ह) सामान्यतः ह्या अधिनियमान्वयेंच्या कामकाजांत अनुसरण्यांत यावयाच्या कार्यपद्धतीचें व अनुसरण्यांत यावयाच्या कोणत्याहि नमुन्यांचें नियमन करणें ;

(आय्) ह्या अधिनियमान्वयें अितर जी कोणतीहि गोष्ट विहित करणें आवश्यक असेल किंवा करण्याची परवानगी असेल अशी कोणतीहि गोष्ट.

(३) ह्या कलमान्वयें कोणतेहि नियम करतांना राज्य सरकारला असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, अशा नियमांचें उल्लंघन करण्यांत आल्यास अशा प्रत्येक उल्लंघनाबद्दल पराकाष्ठा दोनशें पन्नास रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(४) या कलमान्वयें नियम करण्याचा जो अधिकार देण्यांत आलेला आहे त्या अधिकाराची प्रथमतःच अंमलबजावणी करण्यांत आली असेल तर तें खेरीज करून, असा अधिकार ह्या या कलमान्वयें केलेले नियम, ते कायम करण्यापूर्वी आगाऊ प्रसिद्ध करण्यांत येतील या शर्तीस अधीन राहील.

(५) ह्या कलमान्वयें केलेला प्रत्येक नियम तो करण्यांत आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधान मंडळाचें अधिवेशन चालू असतांना एकाच अधिवेशनांत किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरितां राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढें ठेवण्यांत आला पाहिजे ; आणि ज्या अधिवेशनांत तो अशा रीतीनें ठेवण्यांत आला असेल तें अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचें अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमांत कोणताहि फेरफार करण्यास दोन्हीं सभागृहें कबूल होतील किंवा नियम करण्यांत येऊं नये म्हणून दोन्हीं सभागृहें कबूल होतील व असा निर्णय राजपत्रांत अधिसूचित करतील तर, तो नियम अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा सुधारलेल्या अवस्थेंतच केवळ अंमलांत येईल किंवा यथास्थिति तो नियम अंमलांत येणार नाहीं. तथापि, उक्त नियमांत अशा रीतीनें कोणतेहि फेरफार केल्यामुळें किंवा तो नियम रद्द केल्यामुळें त्या नियमान्वयें पूर्वी केलेल्या किंवा करण्याचें राहून गेलेल्या कोणत्याहि गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाहीं.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.